दि.दावा क्र.१६१/२०१२.
किस्नाबाईकृवि.सुर्यप्रकाश.
नि.क्र.१४८ खाली.

**प्रतिवादी साक्षीदार क्र. १ चा उलटतपास वादीतर्फे ॲड. श्री.एम.एम.मेश्राम यांचेमार्फत :-**

३. हे म्हणणे खरे आहे की, विठाबाई ही नारायण बाजीराव हाडके यांची पहिली पत्नी होती. हे म्हणणे खरे आहे की, वादी किसनाबाई ही नारायण हाडके व विठाबाई यांची मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, विठाबाई मरण पावल्यानंतर नारायण हाडके यांनी द्रुपदाबाई हिच्याशी दुसरे लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, बाजीराव हाडके हे माझे आजोबा व सिताराम हाडके हे माझे पंजोबा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केलेली दावा मिळकत ही माझे पंजोबा सिताराम हाडके यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, सिताराम हाडके मरण पावल्यावर त्यांची संपत्ती बाजीराव हाडके व उरुकुडा हाडके यांच्या नावावर झाली. हे म्हणणे खरे आहे की, नारायण हाडके हा बाजीराव हाडके याचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, उरुकुडा हाडके याला कोणतेही अपत्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, बाजीराव हाडके व उरुकुडा हाडके मरण पावल्यावर त्यांची संपत्ती नारायण हाडके याचे नावावर झाली. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडके हे जीवंत असताना त्यांनी त्यांच्या संपत्तीबाबत कोणतेही वाटणीपत्र तयार करुन ठेवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडके यांनी संपूर्ण संपत्ती ही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन घेतलेली आहे तसेच मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडके जीवंत असतानी वादीने वेळोवेळी तिच्या हिस्स्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला देखील संपत्तीच्या वाटणीची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ८३, 84@2, ८६ मौजा दहेगाव व गट नं. २२२ जुना गट नं. ७० मौजा सायकी ही नारायण हाडके याच्या वडीलोपार्जित व एकत्र कुटुंबाच्या

उत्पन्नातुन घेतलेल्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दहेगाव येथील ८ एकर मिळकतीपैकी ६ एकर एवढी मिळकत सरकारने संपादीत केली आहे व उर्वरित २ एकज इतकी मिळकत माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, दहेगावं येथील सरकारने संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला मी घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सायकी व परडगाव येथील २० एकर जागा नारायण हाडके यांनी मी अज्ञात असताना माझे नावावर केली होती. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडके यांना सिलींग विभागातुन नोटीस आल्यामुळे त्यांनी जागा माझे नावावर केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नारायण हाडके हे माझे पालन कर्ता होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०७.१९९२ रोजी नारायण हाडके मरण पावले तो पर्यंत त्यांनी त्यांच्या संपत्तनीचे वाटणीपत्र केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडके यांनी गट नं. 83@1 जुना गट नं.१२ मौजा दहेगाव या संपत्तनीचे मृत्युपत्र माझे नावाने केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले मृत्युपत्र खोटे तयार केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नारायण हाडकेच्या प्रत्येक मिळकतीमध्ये वादीचा 1@3 हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, उरुकुडा हाडके जीवंत असताना त्यांनी त्यांच्या संपत्तीचे कोणतेही मृत्युपत्र किंवा बक्षीसपत्र तयार केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे शपथपत्रात नमुद केलेले बक्षीसपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, किसनाबाई हिला वाटणीमध्ये कोणतीही संपत्ती मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. 83@1 ही वडीलोपार्जित संपत्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. 83@1 मध्ये नारायण हाडके यांच्या वारसांचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत हडपण्याकरिता खोटे मृत्युपत्र तयार करुन त्याचा दुरुपयोग केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खोटा आहे व खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कागदपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही

की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड,

(जा. म. मिस्त्री)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
उमरेड.
दि.२१.१०.२०२१.